# श्राद्धातील कृतींमागील अध्यात्मशास्त्र

## विषयसूची


१. ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ६

२. सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांचा परिचय ! ८

३. आध्यात्मिक परिभाषेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावना ! ९

४. मनोगत १०


## ग्रंथाची अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


**१. श्राद्ध करण्याच्या संदर्भातील कृती १३**

१ अ. श्राद्धकर्ता आणि श्राद्धभोक्ता यांसाठीचे विधीनिषेध १३

१ अ १२. श्राद्धामध्ये ‘ॐ’चा उच्चार का करू नये ? १६

१ आ. श्राद्धसंकल्प करण्यापूर्वी द्वारलोपाचा विचार करणे आवश्यक १७

१ ई. सर्वसाधारणतः श्राद्धप्रयोग कसा असतो ? १९

**२. श्राद्धकर्मातील कृतींमागील अध्यात्मशास्त्र २३**

२ अ. श्राद्धात जानवे उजव्या खांद्यावर (अपसव्य) का घ्यावे ? २३

२ ओ ११. श्राद्धसंपात झाल्यास श्राद्ध कसे करावे ? ४९

२ ओ १२ अ. अविधवा नवमीला श्राद्ध करण्याची पद्धत ४९

२ ओ १२ आ. मातामहश्राद्ध (मुलाने करावयाचे आईच्या वडिलांचे श्राद्ध) ५०

२ ओ १२ इ. योग्य प्रकारे अंत्यसंस्कार न झालेल्यांचे श्राद्ध करता येते का ? ५०

२ ओ १३. श्राद्धविधी मनापासून करण्याचे महत्त्व ५१

**३. श्राद्धामुळे पितरांना सद्‌गती मिळाली, हे ओळखण्याच्या संदर्भातील लक्षणे आणि अनुभूती ५६**

**४. शास्त्रानुसार श्राद्धकर्म न केल्यास होणारी हानी ५७**

**५. श्राद्ध करण्यात अडचणी आल्यास त्या दूर करण्याचे मार्ग ५९**

**६. श्राद्धाची मर्यादा ६२**

**७. सर्वसाधारण व्यक्तीचे श्राद्ध, शक्ती-उपासकांचा आराधना विधी, संतांचा जन्मोत्सव आणि संतांची पुण्यतिथी ६३**

**८. पूर्वजांना सद्गती मिळणे आणि अतृप्त पूर्वजांच्या त्रासांपासून रक्षण होणे यांसंदर्भात श्राद्धविधींप्रमाणेच दत्ताच्या नामजपाचे महत्त्व ६४**

## सनातनच्या चैतन्यमय ग्रंथसंपदेची ठळक वैशिष्ट्ये !

- ग्रंथांतील ७० टक्के लिखाण हे अन्य संदर्भग्रंथांतील लिखाण, साधकांना सूक्ष्मातून मिळालेले ईश्वरी ज्ञान इत्यादी स्वरूपाचे आहे, तर ३० टक्के लिखाण ग्रंथांचे संकलक परात्पर गुरु डॉ. आठवले यांना गुरूंच्या आशीर्वादामुळे आतून स्फुरलेले आहे.
- अध्यात्मातील प्रत्येक कृतीविषयी 'का अन् कसे ?' यांची शास्त्रीय उत्तरे !
- विज्ञानयुगातील वाचकांना सहज समजेल अशा आधुनिक वैज्ञानिक भाषेतील (उदा. टक्केवारी सांगणे) ज्ञान !
- अध्यात्मातील विविध गोष्टींच्या संदर्भात वैज्ञानिक उपकरणांद्वारे केलेले संशोधन, सूक्ष्म स्तरावरील प्रक्रिया दर्शवणारी चित्रे अन् लिखाण !
- साधनेविषयीचे तात्त्विक विवेचनच नव्हे, तर साधना कृतीत आणण्याविषयी मार्गदर्शन !

**टीपा १. ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.**

**२. या ग्रंथात अन्य संदर्भग्रंथ, तसेच लिखाण यांतून काही विषय (मुद्दे) घेतले आहेत. अशा विषयांच्या अंती लहान अक्षरांत कंसात संदर्भक्रमांक घातले आहेत. त्याचे विवरण ग्रंथाच्या शेवटी 'संदर्भसूची'मध्ये दिले आहे.**

## विषयसूचीतील क्रमांक ४

### मनोगत

हिंदु धर्माने सांगितलेल्या ईश्वरप्राप्तीच्या मूलभूत सिद्धांतांपैकी एक म्हणजे 'देवऋण, ऋषीऋण, पितृऋण आणि समाजऋण ही चार ऋणे फेडणे' होय. यांपैकी पितृऋण फेडण्यासाठी 'श्राद्ध' आवश्यक असते. माता-पिता तसेच निकटवर्तीय यांचा मृत्यू नंतरचा प्रवास हा सुखमय आणि क्लेशरहित व्हावा, त्यांना सद्‍गती मिळावी यांसाठीचा संस्कार म्हणजेच 'श्राद्ध.' श्राद्धातील मंत्रोच्चारांमध्ये पितरांना गती देण्याची सूक्ष्म शक्ती सामावलेली असते. श्राद्धात पितरांना हविर्भाग दिला गेल्याने ते संतुष्ट होतात. याउलट श्राद्ध न केल्यास पितरांच्या इच्छा अतृप्त राहिल्यामुळे, तसेच असे वासनायुक्त पितर वाईट शक्तींच्या नियंत्रणात जाऊन त्यांचे दास (गुलाम) झाल्याने वाईट शक्तींनी पितरांचा उपयोग करून कुटुंबियांना त्रास देण्याची शक्यता अधिक असते. श्राद्धामुळे पितरांची या त्रासांतून मुक्तता होऊन आपले जीवनही सुसह्य होते.

श्राद्धाचे इतके महत्त्व असतांनाही आज हिंदूंमधील धर्मशिक्षणाचा अभाव, त्यांचा अध्यात्मावरील अविश्वास, त्यांच्या विचारसरणीवर पाश्चात्त्य संस्कृतीच्या अंधानुकरणाची चढलेली पुटे आदींमुळे श्राद्धविधी दुर्लक्षिला वा अवास्तव अवाजवी कर्मकांडात गणला जाऊ लागला आहे. म्हणूनच अन्य संस्कारांइतकाच 'श्राद्ध' हा संस्कारही अत्यावश्यक कसा आहे, हे सांगणे क्रमप्राप्त ठरते.

श्राद्धाचे महत्त्व, लाभ, प्रकार, श्राद्ध करण्यासंदर्भातील विधीनिषेध यांसारखे मूलभूत ज्ञान 'श्राद्धाचे महत्त्व आणि शास्त्रीय विवेचन' या ग्रंथात दिले आहे. प्रस्तुत ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे, यात श्राद्धातील विविध कृतींमागील बुद्धीपलीकडील अध्यात्मशास्त्रीय कारणमीमांसा स्पष्ट केली आहे. यामुळे श्राद्धाविषयीची सत्यता तर पटतेच, याव्यतिरिक्त श्राद्धाविषयीचे विकल्प दूर होण्यासही साहाय्य होते. श्राद्धात रांगोळीच्या

भुकटीने रांगोळी का काढू नये, श्राद्धात जानवे उजव्या खांद्यावरून (अपसव्य) का घालावे, देवता आणि पितर यांना नैवेद्य दाखवण्याच्या पद्धतींचे शास्त्र काय यांसारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे या ग्रंथात देण्यासहच, श्राद्धामुळे पितरांना सद्गती मिळाली, हे ओळखण्याच्या संदर्भातील काही लक्षणे आणि अनुभूती यांचाही अंतर्भाव यात केला आहे.

सनातनच्या साधकांना ईश्वरी कृपेमुळे प्राप्त झालेले हे ज्ञान पुढच्या स्तराचे असल्याने सर्वसामान्यांना समजण्यास थोडे कठीण आहे. असे असले तरी जिज्ञासा आणि तळमळ असल्यास या ज्ञानाचे आकलन व्हायला साहाय्य होईल.

या ग्रंथाच्या अभ्यासाने आपल्या महान ऋषीमुनींनी दिलेला ‘श्राद्ध’रूपी अनमोल संस्कृतीधनाचा वारसा जपण्याची सद्बुद्धी सर्वांना लाभो, तसेच श्राद्धविधी श्रद्धेने करता येऊन आपल्या पूर्वजांची, तसेच स्वतःचीही उन्नती साधता येवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

---

टीप – ‘धार्मिक कृतींमागील शास्त्र सांगणाऱ्या ग्रंथमालिके’चे सामायिक मनोगत ‘पूजासाहित्याचे महत्त्व’ या ग्रंथात दिले आहे.

## वाचकांना विनंती !

卐 ‘संस्कृत’ ही देवभाषा असून चैतन्यदायी आहे. तिच्यातील चैतन्याचा लाभ वाचकांना व्हावा, यासाठी सनातनच्या ग्रंथांत संस्कृत श्लोक / वचने छापण्यात येतात. यांमध्ये काही त्रुटी आढळल्यास वाचकांनी त्या आम्हाला अवश्य कळवाव्यात.

卐 ग्रंथांत संस्कृत वचने / श्लोक संदर्भासहित दिले आहेत. काही संस्कृत वचनांचे / श्लोकांचे संदर्भ मिळू शकले नाहीत, त्यांच्यापुढे कंसात ‘संदर्भ – अज्ञात’ असे लिहिले आहे. त्यांचा संदर्भ ज्ञात असल्यास कृपया वाचकांनी तो कळवावा.